2020-21



MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned with OKEN Scanner

[redacted]

# Vidyawarta™

## International Multilingual Research Journal

www. विद्यावार्ता® .कॉम

YouTube Channel

*Vidyawarta is peer reviewed research journal. The review committee & editorial board formed/appointed by Harshwardhan Publication scrutinizes the received research papers and articles. Then the recommended papers and articles are published. The editor or publisher doesn't claim that this is UGC CARE approved journal or recommended by any university. We publish this journal for creating awareness and aptitude regarding educational research and literary criticism.*

*The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. This Journal dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute, academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary. Editors and publishers have the right to convert all texts published in Vidyavarta (e.g. CD / DVD / Video / Audio / Edited book / Abstract Etc. and other formats).*

***If any judicial matter occurs, the jurisdiction is limited up to Beed (Maharashtra) court only.***

Indexed

IMPACT FACTOR 7.041 iijif

**Govt. of India, Trade Marks Registry Regd. No. 2611690**

**http://www.printingarea.blogspot.com**



Scanned with OKEN Scanner

26] Economic Impact of Lockdown in India
Dr. Ramesh P. Deshmane, Chikhli, Dist. Buldana ||108

27] Study an Impact of covid-19 Lockdown on Indian Economy Sector.
Mr. Chandrakant B. Dhumale, Akola. ||112

28] Impact of Covid-19 lockdown on employment generation in Indian economy
Dr. J.D. Gupta / Rahul O. Oza, Amravati ||116

29] Impact of COVID 19 on Indian Economy
Prof. Dr. Ram Solankar-Osmanabad. ||119

30] Covid-19 Lockdown – A Paralysis for the Indian Economy
Dr. Vinod R. Bansile/ Mr. Rajkumar R. Wagade- Buldana ||122

31] कोविड—१९ : ग्रामीण अर्थव्यवस्था के लिए एक गम्भीर संकट
डॉ. ज्ञानेश्वर विष्णु गोरे. देऊलगाव राजा, जि. बुलडाणा ||125

32] कोरोना, कोविड—१९, लॉकडाऊनचा, सामाजिक, आर्थिक परिणाम व भारतीय अर्थ ....
प्रा.डॉ. ज्योत्स्ना पुसाटे. अमरावती ||128

33] बेरोजगारी और कोविड १९ का समाज पर परिणाम
प्रा. डॉ. नीता तिवारी . खडकी, अकोला ||131

34] भारतीय अर्थव्यवस्था के सन्दर्भ में कोविड —१९ लॉकडाउन और ग्रामीण विकास
डॉ. नरेंद्र एच. शेगोकार. देऊलगाव राजा, जि. बुलडाणा ||135

35] कोरोना संकट में संगठित और असंगठित श्रमिकों के डाटा, समस्या एवं समाधान की...
उदय प्रताप सिंह, वाराणसी ||137

36] भारतीय अर्थव्यवस्थेवर ोवीड-१९ लॉ डाउनचा पडलेला प्रभाव
प्रा.डॉ.भिमराव प्रल्हाद उबाळे- सिंद ेड राजा, जि.बुलडा ाा ||140

37] कोवीड —१९ लॉकडाऊनचा भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषीक्षेत्रावरील परिणाम
प्रा. डॉ. दिलीप पांडुरंग महाजन . चिखली,जि.बुलडाणा ||143

38] कोरोना — लॉकडाउन आणि भारतीय अर्थव्यवस्था
डॉ. हिरालाल वामन चव्हाण.जळगाव ||147



Scanned with OKEN Scanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 | Vidyawarta® Peer-Reviewed International Journal | Oct. To Dec. 2020 Issue-36, Vol-16 | 0143

व वाहतु कंदचा देखील फार मोठा फटका शेत ज्यांना सहन रावा लागला. यामध्ये १) सर री रेदी वि तिम पुष्पवळा अभावी अने अडयळे निर्मा ा झाले. २) ास ाी व्यापाऱ्यांना शेत ज्यांची पि बाजारात आ ा यास अडयळा निर्मा ा झाला. ३) रब्बी पि ासाठी मजुरांचा तुटवडा निर्मा ा झाला. ४) वाहतु ीची व वाहनचाल ांची मतरता जा ावली ५) मु य मा ाावर शेती मालाच्या वाहतु ीवर ना बंदी. ६) षी उत्पन्न बाजार समितीत मर्यादीत स्वरुपात हो ारे ार्य. ७) ि र ोळ षी बाजारपेठ बंद या मुळे हु द्रा ो, ळी, तुरी, चना, ापुस, मिरची, हळद, जिरे, थेंबिर, ांदा, बटाटे अशा आलाची रेदी वि ी थांबली ोली. ८) षी त्रातील अने मालाच्या िमतीत घट उदा.या लॉ डाउन ाळात टमाटे २ रु. ि लो ने वि ले. ९) द्रा ा उत्पाद ांना १०० ोटी रु. फट ा. १०) मध्य प्रदेशातील ाद्याच्या उत्पादनात घसर ा. ११) पंजाबमध्ये १५ रु. प्रति ि लोने वि ला जा ारा भाजीपाला या महामारीच्या ाळात १ रु. ि लो ने वि ला ोला.

याशिवाय या महामारीच्या अने घट ावर देखील अत्यंत वि ट परि ाम झाला आहे.

१. शेअर बाजार ोसळला.
२. अर्थव्यवस्थेला ि ळ बसली.
३. ुंतव ु दारांमध्ये अविश्वासाचे वातावर ा निर्मा ा झाले.
४. बांध ाम व्यवसाय बंद झाले.
५. बेरोज ारीत वाढ झाली.
६. जेष्ठ ना ारी ांच्या मनात या महामरीची भिती.
७. सरस ट लॉ डाउन मुळे मृतांचा आ डा वाढला.
८. स्थलांतरीत मजुरांचा प्रश्न निर्मा ा झाला.
९. आरो य व्यवस्थेवर मोठा ता ा पडला.
१०. संर ा ा व्यवस्थेवर ही मोठा ता ा पडला.
११. सामाजि ार्य मावर देखील परि ाम.
१२. सामाजि व धार्मि ार्य मावर परि ाम.
१३. लघु व मध्यम स्वरुपाच्या व्यवसायावर परि ाम.
१४. विवाह संस्थेवर झालेला परि ाम.

अशा प्र ारे ोवीड-१९ या महामारीचा भारतीय जनजिवनावर फार वि ट व वाईट परि ाम झालेला आहे. देशातील व समाजातील असा ए ही घट नाही ी ज्या घट ावर या लॉ डाउनचा परि ाम झालेला नाही. अशा वि ट परिस्थितीत ही आज भारतीय मा ुस पुन्हा नव्या जोमाने व नव्या हिम्मतीने सं टाला तोंड देत पुन्हा उभा राहत आहे. देश उभा राहत आहे. थोड्याच दिवसात सर्वच पूर्वपदावर येईल. परंतु Covid-१९ ची द ाल इतीहासात घेतली जाईल एवढे मात्र निश्चित.

□□□

37

# कोवीड –१९ लॉकडाऊनचा भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषीक्षेत्रावरील परिणाम

**प्रा. डॉ. दिलीप पांडुरंग महाजन**
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख
एस.पी.एम.तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय,चिखली,जि.बुलडाणा

**********

**सार :–** भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान असुन ती श्रमप्रधानही आहे. मात्र सध्याच्या कोरोना–१९च्या प्रकोपच्या लॉकडाऊमुळे तिची अवस्था फार बिकट झाली आहे. भारतीय अर्थव्यवस्थेला यामुळे ८ लाख कोटींनचा फटका बसण्याची भिती व्यक्त करण्यात येत आहे. लॉकडाऊनमुळे कारखाने व्यापार, व्यवसाय, रेल्वे व रस्ते वाहतूक, विमानप्रवास पुर्णपणे बंद असल्याने आर्थिक व्यवहार, निर्यात, गुंतवणूक, गरजेच्या वस्तुंची विक्री ठप्प झाली. यातून बाहेर पडण्यासाठी महसुली व वित्तीय उपाय करूनच अर्थव्यवस्थेला उभारी द्यावी लागेल. भारतीय अर्थव्यवस्थेला लॉकडाऊनमुळे ३५ हजार कोटींचा फटका बसत आल्याचा निष्कर्ष ॲक्युट रेटिंग्स ॲण्ड रिसर्च लि. संस्थेने काढला. लॉकडाऊनमुळे देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात ७.५ लाख कोटींच्या फटका बसणार आहे. जी.डी.पी तील फटका दुपटीने वाढण्याची शक्यता आहे. भारताच्या राष्ट्रीय उत्पनात शेतीचा वाटाही महत्वाचा असुन ५२टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. प्रचंड आकारमान व उच्चवृध्दीदर असणाऱ्या लोकसंख्येला गुणवत्तापुर्ण व सृदृढ जिवनमानासाठी आवश्यक भुमिका साकारण्यासाठी भारतातील कृषीक्षेत्राची वाटचाल कोवीड – १९ च्या लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर अभ्यासणे आवश्यक ठरते. त्यादृष्टीने या



Scanned with OKEN Scanner

संशोधनपर शोधनिबंधात " कोवीड–१९ लॉकडाऊनचा भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्रावरील परिणाम" यावर थोडक्यात प्रकाशझोत टाकण्याचा संशोधकाने प्रयत्न केला आहे.

**प्रस्तावना :–** भारतीय अर्थव्यवस्थेतील एकुण अन्नधान्य उत्पादन २९१.९५ दशलक्ष टनापर्यंत वाढलेले असून ते २०१९–२० या चालु वर्षात मागील वर्षापेक्षा ६.७४ मेट्रीक टन अधिक आहे. २०१८– १९ या वर्षात अन्नधान्य उत्पादन २८५. २१ दशलक्ष टन होते. तर डाळींचे उत्पादन २०१९–२० या वर्षात २३.०२ दशलक्ष टन आहे. जे गेल्या ५ वर्षाचे डाळींचे सरासरी वार्षीक उत्पादन २०.२६ दशलक्ष टनापेक्षा आधिक आहे. एकुण अंतर्गत उत्पादन ( जी.डी.पी) मध्ये शेतीचा हिस्सा २००९–१० मध्ये केवळ १४.६ टक्के होता. देशातील ४८ टक्के कार्यकारी लोकसंख्या जी गैरकृषी व्यवसायात कार्यरत आहे. त्याचे एकुण अंतर्गत उत्पादनातील (जी.डी.पी) योगदान ८३ टक्के आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून कोवीड – १९ च्या लॉकडाऊनमुळे तो पुर्णत: मोडकळीस आला आहे. गेल्या ३–४ महीन्यातील कोवीड –१९ लॉकडाऊन ने शेतीची पुर्णपणे वाट लावली आहे. " कोवीड – १९ लॉकडाऊनचा भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्रावरील परिणाम " याचा संशोधकाने शोध घेण्याचा प्रयत्न आपल्या संशोधन लेखात थोडक्यात केलेला दिसून येतो.

**अभ्यासाचे महत्व :–** कोवीड–१९ च्या लॉकडाऊनमुळे कृषीक्षेत्रातील झालेल्या परिणामांचा अभ्यासकाने अभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे. या परिणामांचे मुल्याकंन करणे आवश्यक आहे. त्यासाठी हया अभ्यासाचे महत्व जाणून घेऊन संशोधन लेख तयार करण्यात आला आहे.

**अभ्यासाची उद्दीष्टे :–**

१) कोरोना – १९ च्या लॉकडाऊनमूळे कृषी क्षेत्रासमोरील आव्हानांचा अभ्यास करणे.

२) कोरोना – १९ च्या लॉकडाऊनमुळे कृषी क्षेत्रातील असणाऱ्या संधीचे विश्लेषण करणे.

३) कोरोना – १९ च्या लॉकडाऊमुळे कृषी क्षेत्रातील होणाऱ्या परिणांमाचा अभ्यास करणे व परिणामंच्या सोडवणूकीसाठी उपाय सुचविणे.

**अभ्यासाची गृहितके :–**

१) भारतात कोरोनाचा प्रभाव जगाच्या तुलनेत कमी आहे.

२) भारताच्या कृषी विकासातील वाढ कोरोना – १९ च्या लॉकडाऊमध्ये कमी राहील.

३) कोरोना – १९ च्या लॉकडाऊनचा भारतीय कृषी क्षेत्रावर परिणाम होत राहील.

**संशोधन पध्दती :–** हया संशोधन लेखाचा अभ्यास पूर्णपणे दुय्यम साधन सामुग्रीवर आधारीत असुन त्यासाठी ग्रंथ, पुस्तके, वार्षीकांक, मासिके, साप्ताहिके, दैनिक वृत्तपत्रे, विविध अहवाल, लेख इत्यादींचा संदर्भ म्हणून वापर करण्यात आला आहे.

**कोरोना – १९ ची पार्श्वभूमी :–** कोरोना – १९ हा विषाणू सर्वात घातक गणला जाऊ शकणारा असून जगात आजतागायत ७५,९७,३०४ केसेसला या रोगाची लागण झाली असुन यामुळे जगात ४,२३,८४४ लोकांचा मृत्यू झाला आहे. तर भारतात या रोगाचे २,९८,२८३ रूग्ण असुन ८,५०१ रूग्णाचा या रोगाने मृत्यू झाला आहे. ३१ डिंसेबर २०१९ रोजी चिनमधील 'वुहान' येथे या रोगाच्या संसर्गाची पहीली वार्ता बाहेर आली. अल्पावधीतच हा विषाणू कोवीड – १९ जगातील ११४ देशातील ७५,९७,३०४ रूग्णांपर्यत पाहोचला १२० दिवसात रूग्णांची संख्या १३ पटींपेक्षा जास्त वाढली आहे. भारतात ३० जानेवारी २०२० ला कोरोनाचा विषाणू संसर्गाचे १ ले प्रकरण केरळमध्ये उजेडात आले. १२० दिवसांत तो कोरोना – १९ भारतातील जवळ पास २२ पेक्षा जास्त राज्यांमध्ये पोहोचला आहे. महाराष्ट्रात कोरोना–१९ ची लागण झालेल्यांची संख्या ९७,६४८ तर मृत्यू पावलेल्याची संख्या३,५९० इतकी आहे. तर एकटया मुंबईत ५३,९८५ लोकांना लागण झाली असुन १,९५२ लोक मृत्यू पावले आहे.

**कोरोना – १९ च्या लॉकडाऊनचा शेती**



Scanned with OKEN Scanner

**क्षेत्रावरील परिणाम :—** कोरोना — १९ च्या लॉकडाऊनचा फटका भारतातील शेती क्षेत्रातील आंबा, द्राक्ष, डाळींब, यासारख्या फळांच्या निर्यातीवर विपरीत परिणाम होऊन ५० टक्के हुन जास्त भाजीपाल्याची निर्यात वाहतूकी अभावी घटली. देशातून एकूण निर्यातीपैकी ६५ टक्के फळे व ५५ टक्के भाजीपाला निर्यात करणाऱ्या महाराष्ट्रावर गंभीर आर्थिक संकट उभे राहीले. द्राक्ष निर्यात होऊ शकली नाही. केळी, गहु यांच्याही निर्यातीत घट होणार आहे. २०१८—१९ या आर्थिक वर्षात २ कोटी ३० लाख ८४ हजार ६९० मेट्रीक टन शेतीमाल, फळ, फुल, प्रक्रिया केलेल्या शेती मालाच्या निर्यातीतुन देशाला १ लाख ३० हजार ३८७ कोटी परकीय चलन मिळाले मात्र यावर्षी कोरोना — १९ लॉकडाऊनच्या महामारीने शेतकऱ्यांच्या या मनसुब्यांवर पाणी फिरले आहे.

महाराष्टातुन झालेली निर्यात ( को.रू )

| अ. क्र | फळ | वर्ष | प्रमाण ( मे.टन ) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | अंबा | २०१७ — १८ | ३५३४२.०६ | ३०९ |
| | | २०१८ — १९ | २९३४५.५५ | ३१३ |
| | | २०१९ — २० | २१९२४.०५ | २२४.९९ |
| २ | केळी | २०१७ — १८ | ४४५५९.०३ | १४९.०४ |
| | | २०१८ — १९ | ६१८२९.२३ | २०७.५७ |
| | | २०१९ — २० | २८४४२.०२ | ९५.६८ |
| ३ | डाळींब | २०१७ — १८ | ३२६५२.६ | ४९२ |
| | | २०१८ — १९ | ४०७२० | ४९१.३६ |
| | | २०१९ — २० | ६५९४.०२ | ६९.३५ |
| ४ | द्राक्षे | २०१७ — १८ | २००२०३ | २१०६ |
| | | २०१८ — १९ | १९४९०९.४९ | २११७.८३ |
| | | २०१९ — २० | ३६४४०.७४ | ३४५.८५ |
| ५ | संत्री | २०१७ — १८ | ८७६.२४ | ४.५३ |
| | | २०१८ — १९ | ३७.२३ | ०.२७ |
| | | २०१९ — २० | ४.४८ | ०.०३ |

वरील महाराष्ट्रातील निर्यातीच्या आकडेवारी वरून हे सिध्द होते की, कोवीड कोरोना १९ च्या लॉकडाऊनमुळे भारतातील शेती उत्पादनावर अत्यंत विपरीत परिणाम झाल्याचे दिसून येते. २०१९—२० मध्ये कृषी क्षेत्रातील एकूण मुल्य वाढ दर ४ थ्या तिमाहीत वाढून ५.०९ टक्के पर्यत पोहोचला आहे जो मागील वर्षी याचकाळात समान तिमाहित १.६ टक्के होता.कोविड—१९ लॉकडाऊनचा फटका वर्तमानात मोठया प्रमाणात शेतकऱ्यांना बसला. शेतकऱ्यांना कष्टकऱ्यांना सरकारच्या बेफीकीरी वृत्तीमुळे विमानातुन फिरणाऱ्यांनी हा आयात केला. मात्र त्याची किंमत शेतकऱ्यांना मोजावी लागत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेला जगविणारा , देशाचा आर्थिक डोलारा पेललेला आपला शेतकरी हतबल झाला आहे. शेतमालाला भाव नाही. सिमाबंदीमुळे शेतमाल,जिवनावश्यक वस्तु, भाजीपाला , दुध, फळे, उत्पादकाला बाजारपेठ उपलब्ध करून देणे शेतकऱ्यांच्या हिताचे होते. महाराष्ट्रात रोज एक कोटी १७ लाख लिटर दुधसंकलन होते. त्यापासुन दही, ताक, लस्सी, पनीर, आम्रखंड, श्रीखंड यांची मागणी बंद झाली.त्यामुळे हॉटेल व्यवसाय थंडावला. कामगारांविना दुध पावडर कंपन्या बंद राहिल्या,दुध संकलन वाहातुक बंदीमुळे घटले. कोबंडीपालण व्यवसायही कोरोनामुळे गोत्यात आला.त्याचबरोबर जरबेरा, कार्नेशन, निशीगंध, झेंडु, हळद, अद्रक, फुलशेतीची पण विक्री व निर्यात बंदीने अब्जावधी रूपयांचा माल वाया गेला. कोबी, फ्लॉवर, टोमॅटो, वांगी ,ढबु दोडका, शेवगा, भेंडी, सडली. बाजार व वाहतुक बंद झाल्याने भाजीपाल्यावर फळबागांवर काही शेतकऱ्यांना नांगर फिरवला. ऊस, अंजिर, स्ट्रॉबेरी, केळी, पपई, पेरू, द्राक्ष, चिक्कु, कलिगंड, टरबुज उत्पादक शेतकरी संकटात सापडले. हरभरा,तुर या डाळ पिकांची हि अवस्था तिच होती.द्राक्ष शेतीचे १० हजार कोटीचे नुकसान झाले आहे.विदर्भातील संत्री, मराठवाडयातील मोसंबी झाडावरच सडली. यांचे ज्युसचे छोटे उद्योग बंद पडल्याने त्यालाही उठाव नाही. कांदा शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. कापुस उत्पादक शेतकरी ही संकटात आहे. अमेरिका, बांग्लादेश, चिन ही एतनाम कापसाचे मोठे आयात दार मात्र कोरोनाच्या धुमाकुळामुळे कापसाचे भाव गडगडले. काजु पिकांचीही दलालांनी कोरोनामुळे घटत्या भावाने खरेदी करून शेतकऱ्यांची लुट केली. आंबा ही निर्याती अभावी संकटात सापडला. लॉकडाऊनचा काळ संपे पर्यत ही निर्यातीला गती येईल असे वाटत नाही.ही सरकारची अग्नी व सत्वपरिक्षा घेणारा काळ आहे. सरकार फाटलेल्या आभाळाला ठीगळ लावु शकत नाही.मात्र व्यवस्थेचे भरण पोषण करणाऱ्या शेतकऱ्यांचे पिक शेतात



Scanned with OKEN Scanner

डोलल्या शिवाय कुणाचेही पोट भरणार नाही, हे सर्वांनांच लवकर कळायला हवे.

**लॉकडाऊचे परिणाम :—**

१) १५ लाख कोटी रूपयांचे उत्पादन गमावले.
२) १४ कोटी लोकांचा रोजगार गेला.
३) बेरोजगारीचे प्रमाण २७ टक्के पर्यत वाढले.
४) बेरोजगारीत व वेतनदरात ही वाढ होत आहे.
५) उत्पादन वाढीचा वेग घटत गेला आहे.
६) २०२०—२०२१ चा वृद्धीचा दर शुन्यापेक्षा खाली राहण्याचा अंदाज आहे.
७) लाखो कामगार —मजुर वापसी स्थलांतरात अडकले. अशा मजुरांची संख्या ५ कोटींच्या घरात आहे. स्थलांतरातील हाल वाढले.
८) उपासमार वाढली,उत्पन्न ऱ्हास वाढला.
९) पुरवठा साखळया तुटल्या.
१०) कर्मचाऱ्यांचे पगार तुंबळे, घटले.
११) बॅकाची थकबाकी वाढली.
१२) उत्पादीत माल गोदामात पडुन आहे.

**कृषी क्षेत्रासमोरील आव्हाने :—**

१) कृषी क्षेत्रातील उत्पादन वाढविणे.
२) कृषी क्षेत्रातील रोजगार वाढीवर भर देणे.
३) कृषी क्षेत्रातील गुंतवणुकीत वाढ करणे.
४) कृषी क्षेत्रातील सिंचन सुविधा क्षेत्रात वाढ करणे.
५) कृषी पुरक शेतमाल प्रक्रिया उद्योगांवर, व्यवसायांवर भर देणे.
६) कृषी क्षेत्रातील पिक विमा योजनेत वाढ करणे.

**कृषी क्षेत्रातील संधी :—**

१) कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे.
२) कमी कालावधीत अधिक उत्पादन देणाऱ्या बियाणांच्या शोधावर भर देणे.
३) व्यापारी, नगदी पिकांचे उत्पादन वाढीवर भर देणे

**शेती क्षेत्रावरील परिणांमावरील उपाय योजना:**

१) आंबा, द्राक्षे, ऊस, केळी तसेच इतर शेती उत्पादनांचे कृषी मालप्रक्रिया उद्योग उभारावेत.
२) नगदी पिकांच्या उत्पादनावर भर द्यावा.
३) नाशवंत कृषी मालाची उत्पादने कमी करावीत.
४) कृषी विषयक संशोधनांवर भर द्यावा.

**निष्कर्ष :—**

भारताकडे अन्नसाठा आहे. परकीय चलनाचासाठा आहे. काम करणारी इच्छा शक्ती, श्रमशक्ती आहे. उत्पादनाचे, बेरोजगारीचे, स्थलांतराचे, दारिद्रयाचे यामूळे लोकशाही स्वातंत्र्याचे नुकसान होत आहे. औषध शोध, लस शोध, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचे बळकटीकरण यावर लक्ष देऊन निर्णय व धोरण यांच्या साहय्याने कोरोनाशी व्यवस्थापनाने युध्द करावे. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण कायदा हा लोकशाहीला पर्याय असु नये.

कोरोनाच्या संकटामुळे शेतीत काहीसा बदल करून शेतकऱ्यांच्या हितसंबंधाना केंद्रस्थानी ठेवावे. शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसाठी आवश्यक त्यासर्व उपाययोजनांचा समावेश नियोजनात करावा व नियोजन पूर्ण करून कृषी विभागाच्या महत्वाकांक्षी योजनांची यशस्वी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

**संदर्भ सुची :—**


१) भारतीय शेती क्षेत्रावर कोरोना—१९ च्या लॉकडाऊनचा परिणाम—लेख प्रा.डॉ.दिलीप पां महाजन
२) दै.लोकसत्ता
३) दै.महाराष्ट्र टाईम्स
४) दै.सकाळ
५) दै.नवभारत टाईम्स
६) दै.दिव्य मराठी
७) दै.लोकमत
८) दै.जनसत्ता
९) दै.लोकशाही वार्ता
१०) दै.जनशक्ती
११) दै.जागरण
१२) दै.सामना
१३) दै.तरूणभारत
१४) दै.पुण्यनगरी
१५) दै.नवप्रहार
१६) दै.मातृभूमी


□□□



Scanned with OKEN Scanner

Shri Balaji Sansthan, Deulgaon Raja's

# SHRI VYANKATESH COLLEGE, DEULGAON RAJA

One Day National Webinar on

## IMPACT OF COVID-19 PANDEMIC ON INDIAN ECONOMY

## E - Certificate

This is to Certify that **Prof.Dr.Dilip Pandurang Mahajan** of **S.P.M.Tatyasaheb Mahajan Art's & Commerce College, Chikhli,Dt.Buldana,-443201** has Participated in One Day National Webinar on '**Impact of Covid-9 Pandemic on Indian Economy**' organized by Dept. of Commerce, Shri Vyankatesh College, Deulgaon Raja, Dist. Buldana held on Tuesday, 04 August, 2020.

| Dr. N. H. Shegokar | Dr. V. R. Bansile | Dr. G. B. Jadhav |
|---|---|---|
| Head, Dept. of Commerce | Organizer | Principal<br>Shri Vyankatesh College, Deulgaon Raja |

Scanned with OKEN Scanner